# कशासाठी? कशासाठी?

कशासाठी? पोटासाठी होते रोज दाटीवाटी
जो तो धावे गाडीपाठी कचेरीची वेळ गाठी

रोज लक्ष मुंबावासी रेलवेचे पंख लेती;
मिळवाया रोजीरोटी उमेदीने झेप घेती

असो बाळ ओटीपोटी तान्हे असो एका हाती
असो ज्वर, नसो दृष्टी आधाराला लागो काठी

जिने चढा, धडपडा धक्काबुक्की, झटापटी
सारे कष्ट पकडण्या नऊ फास्ट थेट व्ही टी

दोन वेळ भातासाठी अंगभर चिटासाठी
दीडखणी फ्लॅटासाठी मेटाकुटी, आटापिटी

पकडण्या फास्ट गाडी हिकमत लागे मोठी
मिळवण्या सीट खाली पुण्य थोर हवे गाठी

गर्दीजीवी कुणी गाई, वडे विकी, खिसे काटी
गाडीमध्ये या जीवांच्या आयुष्याची अथ-इती

जीवघेण्या प्रवाहात ओंडक्यांच्या भेटीगाठी
छोट्यामोठ्या आनंदांच्या लुटलेल्या खिरापती

भजनाच्या भेंड्या होती; कुठे अड्डा पत्ते कुटी;
मिसळुनी डबे खाती डाळबाटी, शेवगाठी

धर्मजाती, रोग, साथी विसरती हे सांगाती
सहिष्णुता? नव्हे, नव्हे! अगतिक परिस्थिती.

'रेल रोको', 'मेगॅ ब्लॉक' प्रवासाची अनिश्चिती
अपघात नित्य होती शत मृत्यू एका स्फोटी

खिन्न, सुन्न तरी धावा 'उद्या काय?', नाही क्षिती
चुकणार नाही कधी लिहिले जे या लल्लाटी

दो घडीचा नरक हा फेरे याचे रोज होती;
पोटार्थी या आसक्तांना नसे मोक्ष, नाही मुक्ती

रोज ताज्या उत्साहाने जीव लक्ष धाव घेती;
आसुसून, झेपावून फर्फटती, लटकती!

.............कशासाठी? कशासाठी?
... पोटासाठी पोटासाठी.

-उज्ज्वला दळवी